| **Seat No.** | |
|---|---|

**Set | P**

## Master of Visual Arts (Painting) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
## History of Arts (Indian & Western) (MVA24101)

वार, दिनांकः बुधवार, २९-१०-२०२५      कमाल गुणः ६०

वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

१) खालील पर्यायांपैकी आगोश्तो शोफ्त यांचे कोणते चित्र आहे?
अ) सुवर्णमंदिर    ब) जोफेनी
क) रेल्वे स्टेशन    ड) गुराखी

२) डॅनियल बंधूंनी जलरंगातील ॲक्वाटींट पद्धतीचा श्री गणेशा ––– या देशात केला.
अ) फ्रांस    ब) जपान
क) चीन    ड) भारत

३) महाराजा रणजीत सिंह यांचे व्यक्तिचित्रण करण्याची संधी सर्वप्रथम कोणत्या कलाकाराला मिळाली?
अ) कॅथरीन    ब) जोन स्मार्ट
क) एमिली गार्डन    ड) जॉर्ज विलीसन

४) ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना कोणत्या साली झाली?
अ) १५००    ब) १६००
क) १७००    ड) १८००

५) पटना येथील इंग्रज व्यापारी व पदाधिकाऱ्यांच्या आश्रयामुळे भारतीय कलाकार कोणत्या स्टाईलमध्ये चित्रण करू लागले?
अ) अँग्लो इंडियन    ब) गढवाल
क) बंगाली    ड) रेड इंडियन

६) ––– शैलीचा प्रमुख चित्रकार मोलाराम याचा मुलगा ज्वालाराम याने इंग्रज कमिशनराकडे नोकरी पत्करली.
अ) कांगरा    ब) गढवाल
क) बसोली    ड) मधुबनी

**७)** दत्तात्रय दामोदर देवाळीकार यांचे प्रोफेशन सांगा.
अ) कलाशिक्षक  ब) शिल्पकार
क) मूर्तिकार  ड) साहित्यिक

**८)** खालीलपैकी कोणते कलाकार 'कला महाविद्यालय, इंदोर' या संस्थेतील प्रमुख चित्रकारांपैकी एक होते.
अ) कौशिक  ब) मुजुमदार
क) पाटील  ड) कँवलकृष्ण

**९)** ––– ललित कला महामंडळ या नाट्यसंस्थेने अभिनव कला महाविद्यालयास उपयुक्त आधार दिला.
अ) पुण्याच्या  ब) दिल्लीच्या
क) सांगलीच्या  ड) कोल्हापूरच्या

**१०)** कंपनी शैलीला काय म्हणून संबोधले जाते?
अ) बाजार शैली  ब) दक्षिण शैली
क) तंजावर शैली  ड) पटनाशैली

**११)** कला महाविद्यालय इंदोर या संस्थेला खालीलपैकी कोणत्या नावानेही संबोधले जाते?
अ) ललित कला मंदीर  ब) कला मंदिर
क) चित्रकला मंदिर  ड) सृजन कला मंदिर

**१२)** श्रावणकोर राजाने आपल्या परिवाराची व्यक्तीचित्रे ––– या माध्यमात काढून घेण्यासाठी ब्रिटिश चित्रकारास आमंत्रित केले.
अ) तैलरंग  ब) जलरंग
क) मिश्र  ड) ड्राय पेस्टल

**प्र.२ संक्षिप्त टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

**अ)** ओगोश्तो शोफ्त
**ब)** अभिनव कला महाविद्यालय
**क)** शेवटचा प्रवास अवनिन्द्रनाथ टागोर
**ड)** ग्रीक कला
**इ)** भारतीय पुनरूत्थान काळ
**ई)** गगनेन्द्रनाथ टागोर

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** भारतीय प्रबोधन काळाबद्दल माहिती लिहा.
**ब)** हेलेनिस्क कालखंड व शिल्पकला बद्दल माहिती लिहा.
**क)** पार्थीनॉन मंदिरे याबद्दल सविस्तर विवेचन करा.
**ड)** पटना स्कूल पद्धती बद्दल माहिती लिहा.

**प्र.४ खालीलपैकी प्रश्नाचे तपशीलवार उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** क्रीट शिल्पकला याबद्दल सविस्तर विवेचन करा.

**ब)** राजा रवी वर्मा यांच्या कार्याबद्दल सविस्तर सांगून त्यांच्या एका प्रसिद्ध चित्राचे रसग्रहण करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

भारतीय पुनरूत्थान कालीन चित्रकला म्हणजे काय? हे सांगून त्यातील एका चित्रकाराचे योगदान लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**Master of Visual Arts (Painting) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Philosophy of Arts (Indian & Western) (MVA24102)**

वार, दिनांक: शुक्रवार, ३१-१0-२0२५ कमाल गुण : ६0
वेळ: दुपारी ३:00 ते 0५:३0

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

**१)** बौद्ध धर्माचे ––– तत्त्वज्ञान आहे.
अ) अध्यात्मिक ब) संसारीक
क) त्याग ड) अंतदृष्टी

**२)** माणसाची कर्मे ––– चक्राला गतिशील ठेवतात.
अ) सत्कर्म ब) दुष्कृत
क) संसार ड) दैनंदिन

**३)** ––– या ग्रीक शब्दापासून ॲस्थेटिक्स हा शब्द निर्माण झाला.
अ) ॲस्थेसेन्स ब) ॲस्थेटीप्स
क) ॲस्थेफील ड) ॲस्थेसिस

**४)** सामवेदात ––– कडवी आहेत.
अ) १५३९ ब) १५५0
क) १५६९ ड) १५४९

**५)** अथर्व वेदात एकूण ––– स्तोत्रे आहेत.
अ) ७६0 ब) ७८0
क) ७६२ ड) ७६५

**६)** जैन तत्त्वज्ञानाप्रमाणे प्रत्येक जीवात्मा हा ––– अंश असतो.
अ) अद्वेत ब) दैत्य
क) जैविक ड) दैवी

**७)** सौंदर्य आणि कला ––– यांच्यातील परस्पर संबंधातून कला व्यवहार सिद्ध होतो.
अ) आस्वादक ब) मानव
क) कलाकृती ड) आदर्श

८) जगताचे आकलन करण्याच्या ––– पद्धती आहेत हे अलेक्झांडर बाम गार्डनने मांडले.
   अ) पाच    ब) तीन
   क) दोन    ड) एक

९) अनुभव, विभाव, व्यभिचारी संयोग झाल्यामुळे ––– रस निष्पत्ती होते.
   अ) स्वभाव    ब) अविर्भाव
   क) रसभाव    ड) भावांशी

१०) गद्य मंत्र संहिता प्राचीन ––– आहे.
   अ) अथर्ववेदात    ब) सामवेदात
   क) ऋग्वेदा    ड) यजुर्वेदात

११) कलावंत त्याच्या सुर्जनात निसर्गातील वस्तूंचेच अनुकरण करतो ही संकल्पना ––– यांनी मांडली.
   अ) ॲरिस्टॉटल    ब) प्लेटो
   क) सॉक्रेटिस    ड) व्हॅसिली कॅंडीसकी

१२) क्रिटिक ऑफ जजमेंट ग्रंथातून कांटने ––– साली उदात्त म्हणजे काय याचा शोध घेतला.
   अ) १७९०    ब) १९७२
   क) १९७५    ड) १९८०

**प्र.२ संक्षिप्त टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

**अ)** कला आणि सौंदर्यशास्त्राची व्युत्पत्ती यावर टिपा लिहा.
**ब)** कला आणि सौंदर्यशास्त्राचा एकमेकांशी परस्पर संबंध स्पष्ट करा.
**क)** बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि बुद्ध धम्मावर माहिती लिहा.
**ड)** भट्टनायकाचे भोगवादावर टिपा लिहा.
**इ)** सौंदर्यशास्त्राचे महत्त्व का आहे व कुणासाठी यावर माहिती लिहा.
**ई)** अभिनवगुप्ताच्या अभिव्यक्तिवादावर टिपा लिहा.

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** तत्ववेत्ता हेगेलचे सौंदर्या बद्दलचे मिमांसा स्पष्ट करा.
**ब)** फ्रॉइडचा मनावरील सिद्धांत फेरी ऑन माइंड यावर माहिती लिहा.
**क)** सौंदर्यानुभवाविषयी कलावस्तू आणि त्यातून प्राप्त होणारी माहिती लिहा.
**ड)** चिनी सौंदर्यशास्त्र यावर माहिती लिहा.

**प्र.४ तपशीलवार उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** शैव पंथाचे सिद्धांत व निर्मिती यावर सविस्तर उत्तर लिहून उलगडा करा.
**ब)** वैष्णव पंथाचे सिद्धांत व निर्मिती यावर सविस्तर उत्तर लिहून उलगडा करा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

वैदिक, निषद, उपनिषद धार्मिक, तात्विक विचारांचा परिचय यावर सविस्तर उलगडा करुन उत्तर लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**Master of Visual Arts (Painting) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Research Methodology (MVA24104)**

वार, दिनांकः सोमवार, ०३-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) एखादे संशोधन हे ऐतिहासिक ––– च्या आधारे कले जाते त्यास ऐतिहासिक दृष्टीकोन असे म्हणतात.
अ) दृष्टीकोन, निष्कर्ष आणि माहिती
ब) दस्तऐवज, संदर्भ आणि माहिती
क) संदर्भ, दृष्टीकोन आणि सर्वेक्षण
ड) सर्वेक्षण, सिद्धांत आणि संदर्भ

२) ––– मूळे भूतकालीन जीवनविषयक मूल्य आणि सामाजिक मान्यतेचे निष्कर्ष कळण्यास मदत होते.
अ) ऐतिहासिक दृष्टीकोनामुळे ब) संशोधनामुळे
क) सिद्धंतामुळे ड) अध्ययन दृष्टीकोनामुळे

३) संशोधनासाठी लागणारे विशिष्ट वातावरण नियंत्रित करुन निर्माण केलेल्या प्रयोगशाळेमध्ये प्रयोगाशी संबंधित जे संशोधन केले जाते, त्यास ––– म्हणतात.
अ) प्रायोगिक संशोधन ब) कृती संशोधन
क) तुलनात्मक संशोधन ड) प्रयोगशाळा संशोधन

४) जीवन चरित्रे, संस्था व संघटनांचा इतिहास, शैक्षणिक विचार प्रवाहांचा इतिहास हे ऐतिहासिक संशोधनाचे प्रमुख ––– आहेत.
अ) प्रयोग ब) विचार
क) प्रकार ड) सिद्धांत

५) संकल्पनिक संशोधन हे संशोधन काही कल्पित ––– यांच्याशी संबंधित असते.
अ) संकल्पना व सिद्धांत ब) वस्तुस्थिती व नावीन्य
क) सिद्धांत व विचार ड) संकल्पना व नावीन्य

६) --- या प्रकारात वेगवेगळया दृष्टीकोननातून चांगला अर्थबोध होण्यासाठी संशोधन प्रयत्न असतो.
   अ) शुद्ध संशोधन  ब) संख्यात्मक संशोधन
   क) अन्वेषनात्मक संशोधन  ड) भौगोलिक संशोधन

७) शास्त्रीय पद्धतीने एखाद्या समस्येच्या --- शोध घेणे हा संशोधनाचा हेतू असतो.
   अ) प्रश्नाचा  ब) सिद्धांताचा
   क) उत्तराच  ड) उद्दिष्टांचा

८) एखाद्या घटनेच्या मूळ कारणाचा शोध घेणे हा उद्देश --- संशोधनामध्ये असतो.
   अ) स्पष्टीकरणात्मक  ब) अन्वेषणात्मक
   क) वर्णनात्मक  ड) संख्यात्मक

९) प्रायोगिक संशोधन हे संशोधन --- आधारित असते.
   अ) माहितीवर  ब) सिद्धांतावर
   क) अभ्यासावर  ड) तथ्यावर

१0) --- यांच्या मते नैसर्गिक ज्ञान स्वतःच्या प्रित्यर्थ पाठलाग करते.
   अ) स्मॉल  ब) डिव्हे
   क) स्पेन्सर  ड) मेरी

११) संख्यात्मक संशोधन हे माणसाच्या --- अवलंबून आहे.
   अ) वर्तणुकीवर  ब) विचारावर
   क) अभ्यासावर  ड) बुद्धिमत्तेवर

१२) --- स्थलकालातिथ अभ्यासास महत्वाचे स्थान आहे.
   अ) संशोधनात  ब) अभ्यासात
   क) सिद्धांतात  ड) भूविज्ञानात

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** प्रायोगिक संशोधन.
**ब)** भौगोलिक संशोधन.
**क)** वर्णनात्मक संशोधन.
**ड)** कृती संशोधन.
**इ)** सर्वेक्षण संशोधन.
**ई)** मूल्यमापन संशोधन.

**प्र.३ लघुत्तरी प्रश्न. (कोणतेही दोन)** १२

**अ)** तुलनात्मकतेच्या आधारावर असलेल्या संशोधनामध्ये कोणत्या शोधांचा समावेश होतो?
**ब)** अन्वेषणात्मक संशोधनाबद्दल माहिती लिहा.

**क)** संशोधनाच्या ऐतिहासिक दृष्टीकोनाबद्दल माहिती लिहा.
**ड)** कोणतेही दोन संशोधनाचे प्रकार स्पष्ट करा.

**प्र.४ दीर्घोत्तरी प्रश्न. (कोणताही एक)** १२

**अ)** प्रायोगिक संशोधन आणि सर्वेक्षण संशोधन यांचा फरक स्पष्ट करा.

**किंवा**

**ब)** संशोधन म्हणजे काय?

**प्र.५ दीर्घोत्तरी प्रश्न.** १२

प्रयोजनाच्या आधारावर असलेल्या संशोधनाबद्दल माहिती स्पष्ट करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**Master of Visual Arts (Painting) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**History of Arts (Indian & Western) (MVA24201)**

वार, दिनांक : मंगळवार, २८-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः सकाळी ११:00 ते 0१:३0

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) ––– मध्ये कलकत्ता ग्रुपचा उदय झाला.
अ) १९२५ ब) १९५0
क) १९४३ ड) १९00

२) ––– मध्ये दिल्लीत 'शिल्पीचक्र' ची स्थापना झाली.
अ) १९४५ ब) १९५0
क) १९४३ ड) १९४९

३) चित्रकार स्वामीनाथन व इतर चित्रकारांनी मिळून ––– मध्ये 'आर्टिस्ट प्रोटेस्ट मुव्हमेंट' सुरू केली.
अ) १९८२ ब) १९७0
क) १९५0 ड) १९६५

४) ''कला एक प्रामाणिक क्रिया आहे'' असे ––– यांचे मानणे होते.
अ) कौशिक ब) मजुमदार
क) पाटील ड) कँवलकृष्ण

५) P.A.G. मध्ये सुझा हे या ग्रुपचे ––– या पदावर काम करत होते.
अ) महासचिव ब) अध्यक्ष
क) सचिव ड) उपाध्यक्ष

६) ––– मध्ये आरा यांनी अनावृत्त नामक चित्रांचे प्रदर्शन केले.
अ) १९१९ ब) १९५१
क) १९६0 ड) १९६३

**७)** सतराव्या शतकात पश्चिमेकला इतिहासातील ——— हा प्रमख संप्रदाय उदयास आला.

अ) रोकोको कला  ब) बरोक कला
क) गोथिक कला  ड) पोप कला

**८)** प्रबोधन काळ ते फ्रेंच राज्यक्रांती यामधील ——— या दोन शतकातील कलेला बरोक कला असे संबोधतात.

अ) १६००–१८००  ब) १५००–१६००
क) १७००–१८००  ड) १६००–१७००

**९)** धार्मिक चळवळीमुळे युरोप ——— पंथात विभागले गेले.

अ) ४  ब) २
क) ५  ड) ३

**१०)** प्रोटेस्टंट पंथात ——— विषयावर चित्रे काढण्यास बंदी होती.

अ) धार्मिक  ब) नैसर्गिक
क) ग्रामीण  ड) राजकीय

**११)** 'व्हीनस अँड ॲडॉनीस' हे ——— या कलाकाराचे चित्र आहे.

अ) ई. वी. हॅवेल  ब) अन्निबाले कर्राची
क) आगोश्तो शोफ्त  ड) विलीसन

**१२)** बरोक कलेतील गतिमानतेचा व चैतन्य शीलतेचा प्रभावी आविष्कार प्रथम ——— कलेत दिसून येतो.

अ) शिल्प  ब) चित्र
क) नाट्य  ड) वास्तू

**प्र.२ संक्षिप्त टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

**अ)** स्वच्छंदवाद (पाश्च्यात्य)
**ब)** रोकोको कला
**क)** गोया
**ड)** आधुनिक भारतीय कलेमध्ये मिथक
**इ)** अंजली इला मेनन
**ई)** आधुनिक भारतीय चित्रकलेतील तांत्रिक प्रवृत्ती

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** विल्यम टर्नर यांचे स्वच्छंदवाद (पाश्चात्य) तील योगदान स्पष्ट करा.
**ब)** बरोक कलेबद्दल माहिती लिहा.
**क)** 'नलिनी मलानी' यांच्या कलेबद्दल सविस्तर विवेचन करा.
**ड)** 'कृष्णाजी आरा' यांचे प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुपमधील योगदान स्पष्ट करा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** 'नाईट वॉच' या चित्राचे सविस्तर रसग्रहण करा.

**ब)** विविध ग्रुप, सोसायटी, स्पर्धा याबद्दल सविस्तर विवेचन करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

एम. एफ. हुसेन यांच्या कला शैली, कला वैशिष्टे व कला प्रवास सविस्तर लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**Master of Visual Arts (Painting) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS)**
**परीक्षाः ऑक्टोबर/नोव्हेंबर – २०२५**
**Philosophy of Art (Indian & Western) (MVA24202)**

वार, दिनांक : गुरूवार, ३०-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) त्रिमितीय चित्रांत ती पृष्ठभागांच्या मांडणीची ––– असते.
अ) असमप्रमाणता ब) आकारमाणता
क) दृश्यमानता ड) समप्रमाणात

२) चित्रातील आकारांचे आपापसातील सामंजस प्रस्थापित करणारी संकल्पना म्हणजे ––– होय.
अ) सुसंगती ब) विविध रंगसंगती
क) त्रितीय रंगसंगती ड) मिश्र रंगसंगती

३) विविधता हा ––– कृतीला चित्त भेदक करण्याचा केवळ एक आयाम आहे.
अ) मांडणी ब) संमिश्र
क) कला ड) व्यामिश्र

४) अजिंठाच्या लेण्या ––– नाल्याच्या आकारात वसलेले आहेत.
अ) बैलाच्या ब) घोड्याच्या
क) गाईच्या ड) म्हशीच्या

५) ––– पासून आकाराची सुरुवात होते.
अ) रेषा ब) उकार
क) बिंदू ड) आकार

६) आकारातून ––– स्थितीचाही अनुभव घेता येतो.
अ) विश्व ब) भाव
क) उदास ड) खिन्न

**७)** चित्रकला ही ——— ची आणि ——— ची कला आहे.
   अ) रंगांची आणि आकारांची
   ब) द्विमितीय आणि त्रिमितीय
   क) आकारांची पोकळी आणि खोली
   ड) प्रतीकांची आणि चिन्हांची

**८)** ——— इतकेच रंग गुहा चित्रात वापरलेले दिसतात.
   अ) लाल, पिवळा, काळा व कत्था
   ब) लाल, पिवळा, निळा
   क) हिरवा, नारंगी, जांभळा
   ड) तृतीय श्रेणीतील रंग

**९)** ——— रंग विशुद्धेचे प्रतीक आहे.
   अ) निळा ब) नारंगी
   क) पिवळा ड) लाल

**१०)** एखाद्या पृष्ठभागाचा खडबडीत गुळगुळीत किंवा मृदू असा अनुभव म्हणजे ——— होय.
   अ) लयदार ब) भूमितीय आकार
   क) पोत ड) द्विमितीय आकार

**११)** दृक घटकांचे एकमेकांशी आणि संपूर्ण चित्राशी असलेले आकारमानाचे नाते म्हणजे ———.
   अ) लयबद्धता ब) प्रमाणबद्धता
   क) दर्शनीकता ड) साचेबद्धता

**१२)** ज्या गुणधर्मांमुळे चित्राला गडदपणा किंवा फिकेपणा येतो तो गुणधर्म म्हणजे ——— होय.
   अ) छायाभेद ब) छटा
   क) उठाव ड) प्रकाशभेद

**प्र.२ संक्षिप्त टिपा लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** जॉन रस्किनचा नैतिकवादी तत्त्वज्ञानावर टिपा लिहा.
**ब)** अजिंठा येथील लेणी क्रमांक एक मधील पद्मपाणी आणि वज्रपाणी चित्रांवर वर टिपा लिहा.
**क)** चित्रकलेचे स्वरुप स्पष्ट करा.
**ड)** रवींद्रनाथ टागोर यांनी आधुनिक भारतीय कलेला त्रिविध स्वरुपाचे योगदान दिले यावर टिपा लिहा.
**इ)** कलेची उपयुक्तता आणि अभिव्यक्तीची कलात्मकता अपरिहारता स्पष्ट करा.
**ई)** टोलस्टोयची व्याग्नरवरील टीका टिप्पणी लिहा.

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** गांधार शिल्पशैलीतील बुद्धाची प्रतिमाचे स्पष्टीकरण द्या.

**ब)** गणपती उपनिषदांतील गणेश मूर्तीचे वर्णन करा.

**क)** उपयोजित कला माध्यमे व वृत्तपत्रे यावर माहिती लिहा.

**ड)** भारतीय कलेतील शृंगार शिल्पे यावर सविस्तर माहिती लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे तपशीलवार उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** ललित कलांमधील तंत्र सादरीकरण कला व दृश्यकला यामधील फरक स्पष्ट करुन सविस्तर माहिती लिहा.

**ब)** आधुनिक कला आणि तंत्र, नाटकाचे संहिता लेखन यावर तपशीलवार उत्तर लिहा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

चित्रकलेतील आणि छायाचित्रकलेतील वस्त्रहीनता व त्यांचे प्रकार स्पष्ट करुन सविस्तर माहिती लिहा.